# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/०५/२०१८
## दि.०४/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३०६/१८,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | के.बी.भारमळ,पो.ना.येरवडा,पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | १)सुरक्षा रक्षक नामे-धनराज नामदेव लवटे,रा.सर्व्हे नं.१४, मातोश्री शाळा,रामनगर,येरवडा, पुणे २)ठेकेदार नामे-दशरथ नागु माने, (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २९/०४/२०१८ रोजी १५/३० वा.ते १८/०० वा.चे दरम्यान सर्व्हे नं.१४ मातोश्री शाळा, रामनगर, येरवडा, पुणे या शाळेचे पुर्वेस खोदकाम केलेले खड्ड्यातील पाण्यात |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी मातोश्री शाळा, रामनगर, येरवडा, पुणे या शाळेवर सुरक्षारक्षक म्हणुन डयुटी नेमलेले सुरक्षा रक्षक नामे-धनराज नामदेव लवटे यांना शाळा परिसरात पाणी साठलेला एक मोठा खड्डा खोदलेला असल्याचे व सदर खड्ड्यात पडुन जिवीतहानी होण्याची शक्यता असल्याचे माहित असताना व शाळेला सुट्टी लागलेली असताना देखील त्यांनी १) रुद्रा रुपेश चव्हाण,वय ८ वर्ष, रा.रामनगर, येरवडा,पुणे. २)रुद्र दत्ता भुजबळ,वय ८ वर्ष, रा. सदर या लहान मुलांना त्या ठिकाणी येण्यास मज्जाव केला नाही, त्यामुळे वरील दोन्ही मुलांनी शाळेचे परिसरात प्रवेश केला. तसेच नमुद खोदकामाचे ठेकेदार नामे-दशरथ नागु माने, यांनी शाळा परिसरात कामाकरीता मोठा खड्डा खोदला असुन, त्यामध्ये साठलेले पाण्याकडे दुर्लक्ष करुन सदर पाण्याचा उपसा केला नाही व खोदकाम केलेले खडयाचे ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार अथवा जिवीतहानी होवु नये याकरीता योग्य ती उपाययोजना केलेली नाही. त्यामुळे यातील नमुद इसमांच्या हलगर्जीपणामुळे मुलगा नामे १) रुद्रा रुपेश चव्हाण,वय ८ वर्ष, रा. रामनगर, येरवडा, पुणे. २) रुद्र दत्ता भुजबळ, वय ८ वर्ष, रा.सदर या दोघांचा पाण्यात बुडून मृत्यु झालेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मारोडे ९६८९३१५०२० |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भोसरी पो स्टे २२३/१८,भादविक ४५७,३८० |
| **फिर्यादी** | रतनलाल आगरवाल,वय ५३ वर्षे,रा.बोपखेल,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०५/२०१८ रोजी रात्रौ ०८/०० वा. ते दि.०४/०५/२०१८ रोजी सकाळी ०५/०० वा.चे दरम्यान फिर्यादीचे दुकानात मारुती मंदिरासमोर,बोपखेल,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता. वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांचे दुकान कुलुप लावुन बंद असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या दुकानाच्या दरवाज्याचा कडी कोयंडा तोडुन दुकानात प्रवेश करुन एकुण २ लाख ६८ हजार रुपये रोख रक्कम व फिर्यादी यांच्या दुकानाच्या जवळपास असलेली सौ.लक्ष्मीबाई घुले, यांच्या पानटपरीच्या व इसम नामे-राजु बबनराव घुले यांच्या पानटपरीच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडुन त्यामधील काही सामान कोणीतरी अज्ञात इसमाने लबाडीच्या इरादयाने चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चामले ८३०८४७२००७ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ७२/१८,भादविक ४५४,३८०,३४ |
| **फिर्यादी** | प्रिया डिसिल्वा,वय ३२ वर्षे, वसई रोड वसई वेस्ट मुंबई |
| **आरोपी** | १)अजय दलाया,वय ३० वर्षे, २)एक महिला, वय ६० वर्षे,दोघेही रा.कोरेगाव पार्क, पुणे (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०४/२०१८ रोजी सकाळी ०६/०० वा.ते ०६/२० वा.चे दरम्यान बिहारी दीप बंगलो लेन नं.११ प्रभात रोड एरंडवणा, पुणे (सदरचा फ्लॅट फिर्यादी यांनी भाडयाने घेतलेला आहे.) |
| **तपशिल** | वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी,यातील नमुद इसम व महिला यांनी फिर्यादी यांचा फ्लॅट चावीच्या सहाय्याने उघडुन, त्यावाटे आत प्रवेश करु, फ्लॅटमधील रोख रक्कम व सोन्याचा नेकलेस असा एकुण २ लाख ७८ हजार ६००/-रुपये किंमतीचा ऐवज घरफोडी करुन चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.बी.जोशी ९८५०६६४८४५ |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ३११/१८,भादविक १४३,१४४,१४७,१४८,१४९,५०४,महा.पो.का.क.३७(१)१३५, आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | इतेश इबितवार, पो.शि.निगडी,पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | १)विशाल विठ्ठल पायाल, वय १९ वर्षे,रा.सम्राट हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं.ई ५/११ ओटास्किम निगडी,पुणे २)निखली साहेबराव साठे,वय २३ वर्षे,रा.दळवीनगर,पत्राशेड ओटास्किम निगडी,पुणे ३)किरण राजु पवार, वय २६ वर्षे,रा.दळवीनगर, पत्राशेड,ओटास्किम निगडी, पुणे व इतर ९ ते १० इसम (अ.क्र.१ ते ३ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०५/२०१८ रोजी रात्रौ २२/४० वा.चे सुमारास अमर टेलर शॉप समोरील सार्वजनिक रोडवर दळवीनगर, ओटास्किम निगडी,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसमांनी आपआपसामध्ये भांडणे व शिवीगाळ करुन, एकमेकांच्या दिशेन दगडी, बिअरच्या बाटल्या, दारुच्या बाटल्या फेकुन मारुन, हातात लाकडी दांडकी व लोखंडी तलवारी घेवुन, एकमेकांना मारण्यास आले असताना मिळुन आले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोरे ९९२१९५३३४१ |

## दि.०४/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे २०१/१८,भादविक ३०७,४९८(अ),३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | पोर्णिमा येलंगे,वय ३१ वर्षे,रा.पुणे सातारा रोड,पुणे |
| **आरोपी** | १)राहुल बाबु येलंगे,वय ३३ वर्षे, २)बाबु रामचंद्र येलंगे, व इतर तीन महिला सर्व रा.फ्लॅट नं.४८ एबी विंग सुवर्णनगरी हौसिंग सोसायटी, सिंहगड रोड, वडगाव बु//,पुणे (अ.क्र.१ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०१/२०१३ रोजी ते माहे मार्च २०१८ चे दरम्यान फ्लॅट नं.४८ एबी विंग सुवर्णनगरी हौसिंग सोसायटी, सिंहगड रोड, वडगाव बु//,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,यातील नमुद इसम पती,सासु-सासरे, व दोन नंदा यांनी आप-आपसात संगनमत करून, फिर्यादीस टोचुन बोलुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ करून,तीचे राहते घरी गळ दाबुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.एम.साळुंखे ९५५२८३५३९९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**